सं.फौ.ख.क्र.६८०/२०२३
सरकार वि. माधुरी
नि.क्र.११ च्या खाली

साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–सुनिल दयाराम डांगाले,
वय ४९ वर्ष, व्यवसाय–शेती,
राह.हेवती, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू</u>**

१. दि.११/०७/२०२३ मौजा वडेगाव फाटा उमरेड येथे पोलिसांनी मला पंचनामा करण्याकामी घटनास्थळावर बोलवले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. सहीला **निशाणी क्र.१२** देण्यात आला. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नाही. आता मला पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **निशानि क्र.१३** देण्यात आले. आता मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये माझा फोटो आहे. त्याला **आर्टीकल अ** देण्यात आले.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.११/०७/२०२३ रोजी मौजा वडेगाव फाटा उमरेड येथे पोलिसांनी मला घटनास्थळावर पंचनामा करण्याकामी बोलविले होते व आरोपीच्या ताब्यातुन १८० मिली क्षमतेच्या एकूण ९ देशी दारूच्या निपा जप्त केल्या होत्या व माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला मला वाचुन दाखविला त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**
**<u>आरोपीतर्फे ॲड.एस.जी.फलके यांनी उलटतपास नाकारला.</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२१.११.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड